# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

**EPABX:** 0253-2539100-300. **Phone:** 0253-2539173,174

Website : www.muhs.ac.in, **E-mail** :sw@muhs.ac.in

MUHS

**संदिप श्रीराम कुलकर्णी**
(बी.एस.एल.,एलएल.बी.,एम.पी.ए.पी.,जी.डी.एच.आर)
**प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Sandip Shriram Kulkarni**
(B.S.L., LLB., M.P.A., P.G.H.D.R.)
**Offg. Director, Student Welfare**


मआविवि/एस.डब्ल्यु/एनएसएस/ ५६ /२०२१

दिनांक :-१२/०१/२०२१

प्रति,

डी. वाय. पाटील दंत
स्कूल, डी. वाय. पाटील
नॉलेजसिटी, चारोली
(बी.के.) व्हाया लोहगाव,
पुणे - ४१२१०५

विषय :- राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाहित (Self Finance Unit) एकक मागणी केलेल्या महाविद्यालयांना नविन राष्ट्रीय सेवा योजना एकक सुरु करणेस मान्यता देणेबाबत

संदर्भ :- १.विद्यापीठ पत्र क्र. मआविवि/एसडब्ल्यु/एनएसएस/११०८/२०२० दि. २३/१२/२०२०

२. महाविद्यालय पत्र क्र. DYPDS/१४०६ दि. ३०/१२/२०२०

महोदय,

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भांकित पत्राद्वारे आपण राष्ट्रीय सेवा योजना एककाची (N. S. S. Unit) मागणी केली आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयास २५ **स्वयंसेवक (विद्यार्थी)** संख्येचे **स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजना एकक** (Self Finance N.S.S. Unit) सन २०२०-२१ यावर्षापासून पुढे सुरु करण्यास **खालील अटी व शर्तींच्या आधिन राहून याव्दारे परवानगी देण्यात येत आहे.**

१. राष्ट्रीय सेवा योजना ही केंद्र व राज्य शासन यांची संयुक्तरित्या पुरस्कृत योजना आहे. विद्यापीठास सलंग्नित व इच्छुक महाविद्यालयांनाच राष्ट्रीय सेवा योजना एकक देण्यात येते. ह्या योजनेअंतर्गत नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर असे दोन उपक्रम राबविले जातात. सदर उपक्रम राबविण्यासाठी शासनाकडून स्वयंनिर्वाहित रासेयो एकाकासाठी अनुदान प्राप्त होत नाही. महाविद्यालय व विद्यापीठस्तरावर सदर एककाचा खर्च करावयाचा असतो. रासेयो एकक महाविद्यालयांनी नियमांनुसार दोन्हीही कार्यक्रम राबविणे अनिवार्य आहे.

२. महाविद्यालयात स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजनेचे कामकाज पाहण्यासाठी एक कार्यक्रम अधिकारी व दोन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (एक पुरुष व एक महिला) यांची नियुक्ती करावी. रासेयो कार्यक्रम अधिकारी हे प्रपाठक (Reader) किंवा वरीष्ठ व्याख्याता (Lecturer) स्तरावरचे असावेत. रासेयो कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्यात विद्यापीठास सादर करावी.

३. स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी नियुक्त केलेले कार्यक्रम अधिका व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांनी कमीत कमी ३ वर्ष काम करणे बंधनकारक राहील. त्यांचे नियुक्तीपत्र व ३ वर्ष काम करण्याचे त्यांनी दयावयाचे हमीपत्र विद्यापीठास सादर करावे.

४. रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी टी.ओ.सी. (T.O.C.) अहमदनगर कॉलेज, इम्पॅनेल्ड ट्रेनिंग इन्स्टिटयुट, राष्ट्रीय सेवा योजना, अहमदनगर यांच्याकडुन ०७ दिवसांची रासेयो परिचय प्रशिक्षण कार्यशाळा (Orientation Training) आयोजित केली जाते. सदर कार्यशाळेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांना विद्यापीठाकडुन आदेश प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयाने प्रशिक्षणासाठी पाठवावे. सदर प्रशिक्षणाचा खर्च संबंधित महाविद्यालयाने करावा. प्रत्येक कार्यक्रम अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या कालावधीत एकदा रासेयोचे परिचय प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.

५. विद्यापीठ व महाविद्यालयांच्या सहकार्याने प्रत्येकवर्षी रासेयोचे कार्यक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयाकडुन जमा झालेल्या निधीतुन स्वयंनिर्वाहित रासेयो एकक महाविद्यालयांना एकक संख्येनुसार व संकलीत निधीनुसार विभागुन अनुदान वाटप करण्यात येईल. त्यामुळे महाविद्यालयातील रासेयो एककाचे राष्ट्रीयकृत बॅंकेत स्वतंत्र संयुक्तीक खाते उघडावे. सदर खाते महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने परिचालन करावे. विद्यापीठाकडुन मिळालेले अनुदान सदर खात्यातच जमा करावे व रासेयोशी निगडीत सर्व व्यवहार या खात्यामधूनच करावा. तसेच रासेयो एककाचे खाते असलेल्या बॅंकेचे नाव, खाते क्रमांक, आयएसएफसी कोड वगरे आवश्यक माहीती विद्यापीठास कळवावी. विद्यापीठाकडुन मिळणाऱ्या अनुदानाव्यतिरीक्तचा खर्च महाविद्यालयाने करावा. विद्यापीठाकडुन विभागुन देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेव्यतिरीक्त एककाने/महाविद्यालयाने नियमित कार्यक्रम व विशेष शिबिराकरिता केलेल्या अतिरिक्त खर्चाची प्रतिपुर्ती विद्यापीठाकडुन अनुज्ञेय नसेल. असा खर्च महाविद्यालयाने करणे बंधनकारक असेल.

६. स्वयंहनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजनेत स्वयंसेवकांची नोंदणी करतांना शक्यतो महाविद्यालयात द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचीच नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या स्वयंसेवकांची प्रवर्गनिहाय नावाची यादी सोबत जोडलेल्या नमुन्यात विद्यापीठास पाठवावी. नोंदणी करावयाच्या विद्यार्थी स्वयंसेवकांमध्ये सुमारे .....टक्के अनुसुचित जातीचे व ......टक्के अनुसुचित जमातीचे विद्यार्थी असावेत. रासेयोत सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकांकडून **दरवर्षी रु. १०/- रासेयो स्वयंसेवक नोंदणी शुल्क घेण्यात यावे (Self Finance Unit N. S. S. Contribution). सदर नोंदणी शुल्क धनाकर्षाद्वारे "Director Student's Welfare, MUHS, Nashik" यांच्या नावे स्वयंसेवकांच्या यादीसोबत विद्यापीठाकडे पाठवावे.** स्वयंसेवकांच्या यादीसोबत विहीत शुल्काचा धनाकर्ष नसल्यास सदर स्वयंसेवकांची नोंदणी केली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

७. रासेयो अंतर्गत विशेष शिबीर कार्यक्रम शक्यतो दि. १५ ऑगस्ट ते २८ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करावे व तद्नंतर नियमित व विशेष शिबीर कार्यक्रमाच्या संपुर्ण जमा खर्चाचे वेगवेगळे (स्वतंत्र) हिशोब सनदी लेखापरिक्षकाकडुन (C. A.) लेखापरीक्षण करुन घ्यावे. महाविद्यालयास विद्यापीठाकडून प्रत्येक आर्थिक वर्षासाठी देण्यात येणाऱ्या नियमित व विशेष शिबीर कार्यक्रमाच्या अनुदानाच्या रक्कमेचा हिशोब विहीत नमुन्यात कुठल्याही परिस्थितीत प्रत्येकवर्षी दि. १० एप्रिल पर्यंत विद्यापीठास प्राधान्यक्रमाने सादर करावेत. रासेयोच्या कार्यक्रमांसाठी खरेदी केलेल्या वस्तुंच्या बिलाची छायांकित प्रत अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने साक्षांकित करुन हिशोबासोबत सादर कराव्यात. **सदर हिशोब वेळेत प्राप्त न झाल्यास आपल्या महाविद्यालयाने सदर वर्षाचे विद्यापीठ अनुदान खर्च केले नाही असे समजून देण्यात आलेले अनुदान महाविद्यालयाकडुन**

परत घेण्यात येईल, किंवा महाविद्यालयाने केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येणार नाही. तसेच महाविद्यालयातील स्वयंनिर्वाहित रासेयो एकक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम राबविण्यास अकार्यक्षम आहे असे समजून एकक बंद करण्यात येईल याची कृपया अधिष्ठाता / प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांनी विशेष नोंद घ्यावी.

८. स्वयंनिर्वाहित रासेयोचे नियमीत कार्यक्रम व विशेष कार्यक्रम घेण्याविषयीची माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्टांमध्ये (Appendix) देण्यात आलेली आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने रासेयोचे कार्यक्रम राबवावे व त्याचा अहवाल विहित केलेल्या कालावधीत विद्यापीठास सादर करावा.

९. स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांनी नियमित कार्यक्रमांमध्ये दोन वर्षे (प्रति वर्ष १२० तास) तसेच मंजूर केलेल्या एकक संख्येच्या ५० टक्के स्वयंसेवकांनी सात (०७) दिवसांच्या विशेष शिबीर कार्यक्रमात एकदा सहभागी होणे बंधनकारक राहिल.

१०. महाविद्यालयातील रासेयो एककाचा ४ फुट × ३ फुट आकाराचा फलक तयार करुन महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर लावावा.

कळावे,

प्र.संचालक,
विद्यार्थी कल्याण तथा
रासेयो कार्यक्रम समन्वयक

सोबत :-

१) परिशिष्ट 'अ' ते 'ग' (Appendix 'A' to 'G')
२) हिशोब सादर करण्याचा नमुना (Account Format)
३) रासेयो पुस्तिकेची (NSS Mannual) छायांकित प्रत.